ठाणे, बुधवार दि. १३ मे २०२६ | वर्ष : १५, अंक : १५, पाने : ४, किंमत : २ रुपये | Maharashtra Samrat | Maharashtra Samrat | dainikmahasamrat@gmail.com | Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

मुख्य संपादक : चंद्रकांत भोईटे




अग्रलेख

**मोदींच्या आवाहनाचा अन्वयार्थ**

देशाच्या राजकारणात शब्दांचे वजन असते. विशेषतः ते शब्द देशाच्या पंतप्रधानांच्या तोंडून बाहेर पडले, तर त्यांचे परिणाम केवळ राजकीय राहत नाहीत; ते सामाजिक ......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com


**तापमान**

| कमाल | किमान |
| --- | --- |
| ३७° से | २७° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
| --- | --- |
| १,५३,७१० | २,६०,००० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



पारंपरिक भिक मागण्याचा धंदा आता कॅशलेसकडे वळवू या. क्रेडीट, डेबिट कार्ड काढून ऑनलाईन भिक मागू, तेवढाच बदल..

## ■ ३ मे २०२६ रोजी घेण्यात आलेली

# नीट परीक्षा रद्द

## पेपरफुटीच्या घटनेनंतर शासनाचा निर्णय

**नवी दिल्ली : राज्यातील 10 वी आणि 12 वी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून 10 वी नंतर अनेकांनी नीट (NEET) परीक्षेची तयारी सुरू केली आहे. तर, 12 वीच्या (HSC) परीक्षेनंतर कित्येक विद्यार्थ्यांनी NEET परीक्षा देऊन भविष्यात डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले होते. मात्र, केंद्र सरकारने नीट परीक्षेसंदर्भात मोठा निर्णय घेतला असून यंदाच्या वर्षी म्हणजेच 3 मे 2026 रोजी घेण्यात आलेली नीट परीक्षा रद्द करण्यात आली आहे. आता, ही परीक्षा नव्याने घेण्यात येणार असल्याचे स्पष्ट झालं आहे. नीट परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे शासनाने हा निर्णय घेतला असून काँग्रेस नेते तथा लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही नीट परीक्षेतील पेपरफुटीचा मुद्दा उपस्थित केला होता.** (पान 2 वर)

### विद्यार्थ्यांमध्ये संताप, मानसिक आणि आर्थिक ताण वाढला

या निर्णयाचा सर्वाधिक फटका मागील दोन वर्षांपासून मेहनत घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बसत आहे. अनेक विद्यार्थ्यांनी अत्यंत कठीण आर्थिक आणि मानसिक परिस्थितीतून नीटची तयारी केली होती. परीक्षा चांगली गेल्याने चांगल्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळेल, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली होती. मात्र अचानक परीक्षा रद्द झाल्याची माहिती समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांवर मोठा मानसिक ताण निर्माण झाला आहे. (पान 2 वर)




### २० लाख विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार

## पंतप्रधान मोदी २२ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्यासोबत खेळत आहेत



राहुल गांधी संतप्त

काँग्रेस नेते राहुल गांधींनीही NEET 2026 च्या परीक्षेचा पेपर लीक झाल्याबद्दल ट्विट केलं होतं. ही आता परीक्षा राहिलेली नाही, NEET आता एक लिलाव बनला आहे. परीक्षेच्या तब्बल 42 तास आधीच अनेक प्रश्न WhatsApp वर विकले जात होते. २२ लाखांहून अधिक मुलांनी वर्षभर रात्रंदिवस जागून अभ्यास केला, आपल्या भविष्यासाठी झटले, आणि एका रात्रीत त्यांच्या भविष्यास खुलेआम बाजारात लिलावाला ठेवण्यात आले. ही पहिली वेळ नाही. गेल्या 10 वर्षांत 89 पेपर लीक झाले असून 48 वेळा पुन्हा परीक्षा घ्यावी लागली आहे. प्रत्येक वेळी तीच आश्वासने, आणि नंतर तीच शांतता, अशा शब्दात राहुल गांधींनी नीट पेपरफुटीवरुन संताप व्यक्त केला होता. मोदीजी, जेव्हा प्रत्येक अपयशाचे बिल तुम्ही जनतेच्या माथी मारता, तेव्हा त्या बिलामध्ये गरीबांच्या मुलांचे भविष्यही सामावलेले असते. २२ लाख विद्यार्थ्यांचा विश्वास तुटला आहे, भारताच्या तरुणांच्या स्वप्नांसाठी मोदी सरकारपेक्षा दुसरा मोठा धोका नाही. मी भारताच्या तरुणांसोबत उभा आहे. हा काळ अत्यंत कठीण आहे, मला याची जाणीव आहे. पण, ही व्यवस्था कायम अशी राहणार नाही. आपण सगळे मिळून ती बदलू, असेही राहुल गांधींनी म्हटले होते.

### पेपरफुटी प्रकरणात मोठी आर्थिक देवाणघेवाण, 30 वर्षीय युवकास अटक

(सविस्तर वृत्त पान 2 वर)

## पंतप्रधानांचे आवाहन पाळा , बैलगाड्यांनी प्रवास करा

# राष्ट्रवादी (श.प.) ने चालविले रस्त्यावर बैलगाड्या आणि टांगे

**ठाणे - पंतप्रधान मोदी यांनी पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करावा, असे आवाहन केले आहे. एकीकडे शेकडो गाड्यांचा ताफा घेऊन फिरणारे पंतप्रधान जनतेला धडे देत आहेत. त्यांच्या या आवाहनाची अंमलबजावणी सर्वात आधी महापौर आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी करावे, अशी मागणी करीत राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीत जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान यांच्या नेतृत्वाखाली बैलगाडी मोर्चा काढण्यात आला. या मोर्चेकऱ्यांनी महापौर शर्मिला पिंपलोळकर यांना निवेदन देऊन, खासगी गाड्यांचा वापर न करता टीएमटीच्या बसगाड्यांची वापर करावा, असे आवाहन केले.**










ठाणे - दोन दिवसांपूर्वीच भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परदेशी चलन वाचविण्याचे आवाहन भारतीयांना केले आहे. हे चलन वाचविण्यासाठी त्यांनी काही उपाय सूचविले आहेत. अर्थात, हे उपाय म्हणजे "भीक नको, कुत्रं आवर" अशा पद्धतीचे आहेत, असा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाने गणेशवाडी ते ठाणे महानगर पालिका मुख्यालय अशी रॅली काढली. या रॅलीत डॉ. जितेंद्र आव्हाड यांनी चक्क घोड्यावर बसून महानगर पालिकेपर्यंत प्रवास केला. तर, जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान, महिला अध्यक्ष मनीषा भगत, युवक अध्यक्ष अभिजित पवार , युवक कार्याध्यक्ष राजेश कदम यांनी बैलगाडीतून पालिका मुख्यालय गाठले.

या रॅलीमध्ये घरात नाही आणा आणि मला बाजीराव म्हणा, वाह रे मोदी तेरा खेल ... महंगा हुआ तेल ; मोदी फिरतात परदेशी.... जनता राहणार उपाशी ; मोदी घालतात कोटींचा कोट , जनतेचे गेले खपाटीला पोट; चेल्या चपाट्याना कोट्यवधींचे कंत्राट, देशाची अर्थव्यवस्था झाली सपाट , अशा घोषणा देण्यात आल्या. ठाणे महानगर पालिकेसमोर या रॅलीचा समारोप करण्यात आला.

यावेळी डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी केंद्र सरकारवर जोरदार टीका केली. ते म्हणाले, देशाची अर्थव्यवस्था डबघाईस आली आहे. बंगालच्या निवडणुका संपल्या आहेत. आता पेट्रोल तीस रुपयांनी महाग करायला हे सरकार मागे पुढे पाहणार नाहीत. येणाऱ्या काळात पेट्रोल डिझेलचे भाव वाढणार आहेत. त्यामुळे घोडा, बैल म्हैस स्वस्त करून सरकारने ते विकावेत, अन् जनतेने त्यावर बसून जय मोदी, जय मोदी करीत प्रवास करावा का?देशाची अर्थव्यवस्था प्रचंड ढासळली आहे.

अचानक रात्री आठ वाजता मोदी भारतीयांना सोने खरेदी करू नका, असे सांगत आहेत. सोनं कोण खरेदी करतं, मध्यमवर्गीय लोकच ना? अडीनडीला सोनं उपयोगी पडावी, अशी भावना त्या मागे असते. सोने खरेदी थांबली तर त्यावर गुजराण (पान 2 वर)

### आयुक्त आणि महापौर उपमहापौर यांनी परिवहनचा प्रवास करावा...

शासकीय संस्थेकडूनच परदेशी चलनाची उधळपट्टी रोखण्यासाठी ठाणे शहराच्या प्रथम नागरिक म्हणून महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी खासगी वाहनाऐवजी टीएमटीद्वारे संचालित इलेक्ट्रिक बससेवेचा वापर करावा; तसेच, इतर पदाधिकारी, आयुक्त तथा सर्व अधिकाऱ्यांना टीएमटीच्या इलेक्ट्रिक बससेवेचा वापर करण्यासाठी त्यांनी आदेश देऊन परदेशी चलन वाचविण्यात पुढाकार घ्यावा, अशी विनंती केली. तसेच, आमचे हे आवाहन जर संबधीतानी पाळले नाही तर हे सत्ताधारीच पंतप्रधानांच्या आवाहनाला जुमानत नसल्याचे स्पष्ट होणार आहे, असेही प्रधान म्हणाले.

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या मंजुरी शिवाय मंत्र्यांना विमान वापरता येणार नाही



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंजूरी घेतल्याशिवाय राज्यातील मंत्र्यांना विमान वापरता येणार नाही, असा सूचना देण्यात आल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काटकसरीच्या आवाहनानंतर राज्यात अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मंजुरी शिवाय विमान वापरता येणार नाही, अशा सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती मंत्री आणि भाजपनेचे ज्येष्ठ नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

एखाद्यावेळी तातडीने कुठे जायचं असेल तर मी विमान वापरतो. माझ्या वर्षभरात चार-पाच वेळा तातडीचे काम असते तेव्हाच विमानाने जातो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खूप व्यस्त असतात, म्हणून ते विमान वापरतात, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी सर्वांना सूचना दिलेल्या आहेत. आता मुख्यमंत्र्यांच्या मंजूरी शिवाय मंत्र्यांना विमान वापरता येणार नाही, अशा सूचना देण्यात आल्या आहेत, असं चंद्रशेखर बावनकुळेंनी सांगितले. तसेच माझ्या जास्तीत जास्त बैठका ऑनलाइन असतात. मी जिल्हाधिकारी, अधिकाऱ्यांना बोलवत नाही. मी ऑनलाइन बैठका घेऊन तोडगा काढतो, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.




### थोडक्यात घडामोडी

## विधान परिषदेच्या १७ जागांसंदर्भात पुढील आठवड्यात निवडणूक जाहीर होण्याची शक्यता

ठाणे-पावसाळी अधिवेशनाआधी विधान परिषदेच्या सदस्यसंख्येत आणखी भर पडणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या 17 जागांसंदर्भात पुढील आठवड्यात निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच राज्यात न झाल्याने या मतदारसंघामध्ये पूर्वी निवडून आलेल्या आमदारांचा कार्यकाळ संपुष्टात येऊनही निवडणूक होऊ शकली नाही. अशात, गेल्या दोन अडीच वर्षांपासून आमदारकीच्या जागा रिक्त आहेत.

काही दिवसांआधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील एकूण मतदार संख्येच्या 75 टक्के मतदार संख्या असेल तर विधान परिषदेची निवडणूक घेता येते. अशात, या 17 जागांसंदर्भात पुढील आठवड्यात निवडणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. विधान परिषदेच्या एकूण 78 सदस्य संख्येपैकी 22 सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून जात असतात.

■ **पुढील मतदारसंघात होऊ शकते निवडणूक-** सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग, नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजी नगर - जालना, नागपूर


# पुढील तीन दिवस उष्णतेची लाट

### मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यामध्ये उच्चांकी तापमान

**पुणे: महाराष्ट्रात पुढील 3 दिवस उष्णतेची लाट येणार असल्याची माहिती पुणे हवामान विभागाचे सायंटिस्ट सखाराम सानप यांनी दिली आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यामध्ये उच्चांकी तापमान वाढणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली आहे. पुढील 3 दिवसात राज्यात उष्माघाताचा (Pune IMD News) धोका वाढला आहे, उष्माघातामुळे रुग्णसंख्या वाढण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. महाराष्ट्र उन्हाने तापला आहे, पुढील तीन दिवस सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पुढील 3 दिवस महाराष्ट्राच्या बहुतांश जिल्ह्यांना उष्णतेचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. अकोला आणि नंदुरबार जिल्ह्याचे तापमान 45.3 अंशाच्या पुढे गेले आहे.**

### तीन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा

सद्या राज्यातील बहुतांश जिल्ह्याचे तापमान 40 च्या पुढे असून पुढील तीन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. नागरिकांनी पुढील 3 दिवस विशेष काळजी घेण्याची गरज असल्याचे पुणे हवामान विभागाकडून सांगण्यात आले आहे. पुढील 5 दिवसात पावसाची शक्यता नसल्याने तापमान घटण्याची शक्यता कमी असल्याचा अंदाज देखील त्यांनी वर्तवला आहे. पुढील तीन ते चार दिवसांत तापमान वाढण्याचा अंदाज व्यक्त पुणे हवामान खात्याकडून वर्तवण्यात आला आहे. राज्याच्या कमाल तापमानात पुढील चार दिवसांत आणखी वाढ होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यामध्ये नागरिकांना उष्णतेचा सामना करावा लागणार आहे.



### उत्तर-मध्य महाराष्ट्रात उष्णतेचा यलो अलर्ट

पुढील चार दिवस राज्यातील काही भागात उष्णतेची लाट असेल, अशी शक्यता पुणे हवामान विभागाचे सायंटिस्ट सखाराम सानप यांनी वर्तवली आहे. उत्तर-मध्य महाराष्ट्रात उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. रविवारी राज्यातील बहुतांश जिह्यांत तापमानाचा पारा 40 अंशांवर पोहोचला. काही जिल्ह्यांमध्ये तर ४० पेक्षा जास्त होता, यामुळे राज्यात पुन्हा उन्हाचा तडाखा वाढताना दिसत आहे. मागील काही दिवसांपासून राज्यात बहुतांश भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली. यामुळे नागरिकांना तीव्र उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला होता.

### उष्णतेचा यलो अलर्ट


मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यामध्ये उच्चांकी तापमान वाढणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली आहे. पुढील 3 दिवसात राज्यात उष्माघाताचा धोका वाढला आहे, उष्माघातामुळे रुग्णसंख्या वाढण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. महाराष्ट्र उन्हाने तापला आहे, पुढील तीन दिवस सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पुढील 3 दिवस महाराष्ट्राच्या बहुतांश जिल्ह्यांना उष्णतेचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. अकोला आणि नंदुरबार जिल्ह्याचे तापमान 45.3 अंशाच्या पुढे गेले आहे.

### आनंदाची बातमी; अंदमानात 'मान्सून'साठी पोषक वातावरण

## लवकरच पावसाची एन्ट्री होण्याची शक्यता, तापमानातही बदल

मुंबई: भारतीय हवामान खात्याने (IMD) नैऋत्य मान्सून आगमनचा अंदाज वर्तवला आहे. अंदमानचा समुद्र आणि अंदमान निकोबार बेटांच्या काही भागात आठवड्याच्या शेवटापर्यंत मान्सून दाखल होण्यास अनुकूल वातावरण झाले असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने (Monsoon Update) वर्तवला आहे. महाराष्ट्रात १५ मे पर्यंत ठिक ठिकाणी २-३ अंश सेल्सिअस तापमानात वाढ होणार आहे. दरम्यान, राज्यातील तापमान १८ मे पर्यंत चढेच राहण्याची शक्यता देखील हवामान विभागाने वर्तवली आहे. राज्यातील काही भागात उष्णतेच्या लाटेचा अंदाज वर्तवला आहे.

**6 जून रोजी कोकणात मान्सूनचे आगमन होणार -** भारतीय हवामान खात्याने (IMD)नैऋत्य मान्सून आगमनचा अंदाज वर्तवला आहे. अनुकूल हवामान परिस्थिती असल्याने 6 जून रोजी कोकणात मान्सूनचे आगमन होणार असून, त्यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे. नैऋत्य मान्सून दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागरातील काही भाग आणि निकोबारांच्या बेटांवर



पुढील 48 तासात दाखल होण्यासाठी अनुकूल वातावरण आहे. त्यामुळे केरळ आणि राज्यात देखील मान्सून वेळेवर दाखल होण्याचा अंदाज आहे.

IMD ने यापूर्वी 19 मे पर्यंत मान्सून दक्षिण अंदमान समुद्रात दाखल होण्याची शक्यता वर्तवली होती. यानंतर 31 मे पर्यंत मान्सून देशाचे प्रवेशद्वार असलेल्या केरळमध्ये पोहोचेल, अशी माहिती दिली आहे. यामुळे राज्याच्या इतर भागात मान्सूनच्या आगमनाबाबत उत्सुकता असल्याचे आयएमडी अधिकाऱ्यांनी सांगितले. IMD अंदमान आणि केरळ प्रदेशात (पान 2 वर)

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## मोदींच्या आवाहनाचा अन्वयार्थ

देशाच्या राजकारणात शब्दांचे वजन असते. विशेषतः ते शब्द देशाच्या पंतप्रधानांच्या तोंडून बाहेर पडले, तर त्यांचे परिणाम केवळ राजकीय राहत नाहीत; ते सामाजिक, आर्थिक आणि मानसिक पातळीवरही उमटतात. अलीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना काटकसर करण्याचे आवाहन केले. सोन्याची खरेदी कमी करा, पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करा, गरज नसेल तर परदेश दौरे टाळा, वर्क फ्रॉम होमचा पर्याय स्वीकारा, विजेवरील वाहनांचा वापर वाढवा अशा सूचना त्यांनी दिल्या. वरकरणी हे आवाहन जबाबदार नेतृत्वाचे वाटते; परंतु याच आवाहनाच्या पार्श्वभूमीवर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी उपस्थित केलेले प्रश्न अधिक गंभीर आणि अस्वस्थ करणारे आहेत.

राज ठाकरे यांनी थेट विचारलेला मुद्दा हा केवळ पेट्रोलच्या किंमतींचा नाही, तर सत्तेच्या नैतिकतेचा आहे. जनतेला काटकसर शिकवताना सत्ताधारी स्वतः त्याच तत्त्वांचे पालन करतात का ? हा प्रश्न लोकशाहीत विचारलाच पाहिजे. कारण देशातील सर्वसामान्य नागरिक आधीच महागाई, बेरोजगारी आणि आर्थिक असुरक्षिततेच्या विळख्यात अडकलेला आहे. अशा वेळी सरकारकडून कमी खर्च करा हे आवाहन आले, तर ते लोकांच्या वेदनांवर मीठ चोळणारे ठरू शकते. पेट्रोल आणि डिझेलचे आंतरराष्ट्रीय भाव ९० ते १०० डॉलर्स प्रति बॅरलच्या आसपास गेले आहेत, हे खरे आहे. पण ही परिस्थिती अभूतपूर्व नाही. याआधीही अनेकदा असे दर वाढलेले जगाने पाहिले आहेत. अरब स्प्रिंगच्या काळात, २०१३-१४ मध्ये आणि नंतर ओपेकच्या निर्णयांमुळेही तेलाचे भाव याच पातळीवर पोहोचले होते. त्या काळात देशाने काटकसरीचे सरकारी आवाहन ऐकले नव्हते. मग आजच अशी वेळ का आली? हा प्रश्न रास्त आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, जेव्हा कच्च्या तेलाचे दर ६०-६५ डॉलर्सच्या आसपास होते, तेव्हाही भारतातील नागरिकांना महाग पेट्रोल-डिझेल विकले जात होते. केंद्र सरकारने अबकारी कराच्या माध्यमातून लाखो कोटी रुपये जमा केले. पण त्या पैशांचा नेमका उपयोग कुठे झाला? सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, रोजगार निर्मिती किंवा कृषी क्षेत्रात त्या प्रमाणात गुंतवणूक दिसून आली नाही. उलट, आजही सरकारी तिजोरीवर ताण असल्याचे चित्र रंगवले जात आहे. त्यामुळेच राज ठाकरे यांचा प्रश्न अधिक बोचरा ठरतो, चुका तुमच्या, आणि त्याचा भुर्दंड जनतेला का ? यामध्ये आणखी एक मोठा विरोधाभास दिसतो. एका बाजूला जनतेला पेट्रोलची बचत करण्याचे आवाहन केले जाते, तर दुसऱ्या बाजूला निवडणुकांच्या काळात हजारो वाहनांचे ताफे, भव्य रोड शो, हेलिकॉप्टर प्रवास आणि कोट्यवधी रुपयांचा प्रचार यावर उधळपट्टी होते. पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम, बिहार किंवा महाराष्ट्र असो. प्रत्येक निवडणुकीत सत्ता मिळवण्यासाठी प्रचंड आर्थिक संसाधने वापरली गेली. त्या वेळी इंधन बचतीचा विचार का झाला नाही? हा प्रश्न केवळ विरोधकांचा नाही; तो सामान्य करदात्याचाही आहे.

राज ठाकरे यांनी रेवडी संस्कृतीवर केलेली टीका देखील विचार करण्यास भाग पाडते. एकीकडे मोफत योजनांची खिल्ली उडवायची आणि दुसरीकडे निवडणुकांमध्ये त्याच योजनांचा आधार घेऊन मते मिळवायची, हा राजकीय दुटप्पीपणा देशातील मतदार ओळखू लागला आहे. महाराष्ट्रातील लाडकी बहीण योजनेचा उल्लेख करताना त्यांनी सांगितलेली बाब महत्त्वाची आहे. महिलांना खऱ्या अर्थाने आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याऐवजी तात्पुरती मदत देऊन राजकीय लाभ मिळवणे हा विकासाचा शाश्वत मार्ग नाही. या योजनांमुळे राज्यांच्या तिजोरीवर प्रचंड ताण येतो, हे अर्थतज्ज्ञ सातत्याने सांगत आहेत. आज देशाची अर्थव्यवस्था वरकरणी मजबूत दिसत असली, तरी तिच्या आतल्या संरचनेत अनेक तडे पडलेले आहेत. रुपयाचे सातत्याने होणारे अवमूल्यन, विदेशी गुंतवणूकदारांचा भारतीय बाजारातून बाहेर पडण्याचा कल, रोजगार निर्मितीतील मंदावलेली गती आणि वाढती आर्थिक विषमता ही त्याची काही लक्षणे आहेत. गेल्या काही महिन्यांत विदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणात पैसा काढून घेतल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. हा केवळ बाजाराचा चढ-उतार नाही; तर गुंतवणूकदारांच्या विश्वासातील कमीपणाचे संकेत आहेत.

शिक्षण क्षेत्राबाबतचा मुद्दाही दुर्लक्षित करता येणार नाही. हजारो विद्यार्थी परदेशात शिक्षणासाठी जात आहेत. त्यामागे केवळ परदेशी आकर्षण नाही, तर देशांतर्गत दर्जेदार शिक्षण आणि संशोधनाच्या मर्यादित संधी हेही वास्तव आहे. अशा वेळी परदेशात जाणे टाळा असे सांगणे सोपे आहे; पण भारतातच जागतिक दर्जाचे वातावरण निर्माण करण्यासाठी काय प्रयत्न झाले, याचे उत्तर सरकारला द्यावे लागेल. राज ठाकरे यांनी मांडलेला सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे नेतृत्वातील नैतिकता. त्यांनी माजी पंतप्रधान लाल बहाददूर शास्त्री यांचा दाखला दिला. १९६५ च्या युद्धकाळात शास्त्रींनी देशवासीयांना उपवासाचे आवाहन केले, पण ते स्वतःही त्याचे पालन करत होते. नेतृत्वाचे सामर्थ्य हे केवळ भाषणांत नसते; ते कृतीतून सिद्ध करावे लागते. आज जर सरकार काटकसरीचा संदेश देत असेल, तर सर्वप्रथम मंत्र्यांचे ताफे, सरकारी उधळपट्टी, प्रचार खर्च आणि अनावश्यक दौरे कमी करण्याचे धाडस दाखवावे लागेल.

लोकशाहीत प्रश्न विचारणे हा अपराध नाही. उलट, प्रश्न विचारले जात नसतील तर लोकशाही कमकुवत होते. राज ठाकरे यांनी आपल्या पत्रात विरोधासाठी विरोध न करता आर्थिक धोरणांवर स्पष्ट चर्चा मागितली आहे. संसदेत विशेष अधिवेशन बोलावून देशाच्या आर्थिक स्थितीवर सविस्तर चर्चा व्हावी, ही मागणी चुकीची म्हणता येणार नाही. कारण अर्थव्यवस्था ही कोणत्याही एका पक्षाची मालमत्ता नसते; ती संपूर्ण देशाच्या भविष्याशी जोडलेली असते. आज भारत एका विचित्र वळणावर उभा आहे. एका बाजूला जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असल्याचा अभिमान व्यक्त केला जातो, तर दुसऱ्या बाजूला सामान्य नागरिकाला घरखर्च भागवणे कठीण होत आहे. जीडीपीच्या आकड्यांनी विकास मोजला जातो, पण रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि खरेदी क्षमता यांच्याद्वारे लोकांचे जीवनमान ठरते. सरकारने या वास्तवाकडे प्रामाणिकपणे पाहण्याची गरज आहे.

राज ठाकरे यांच्या या परखड पत्रातून काही मुद्द्यांवर राजकीय टीका नक्कीच दिसते; परंतु त्यामागील मूलभूत प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाहीत. देशातील आर्थिक परिस्थिती नेमकी काय आहे ? महागाई आणि इंधन दरवाढीचा दीर्घकालीन आराखडा काय? सरकारी खर्चावर नियंत्रण कसे आणले जाणार ? विदेशी गुंतवणूक का कमी होत आहे ? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, काटकसरीचा भार नेहमी सामान्य नागरिकांवरच का टाकला जातो ? या प्रश्नांची उत्तरे सरकारने द्यायलाच हवीत. कारण लोकशाहीत सत्ता ही जनतेच्या विश्वासावर उभी असते. तो विश्वास टिकवण्यासाठी केवळ भावनिक आवाहने पुरेशी नसतात; त्यासाठी पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि आत्मपरीक्षणाची तयारी लागते. आज देशाला नेमकी त्याच गोष्टीची गरज आहे.

# मान्सून काळात सर्व प्राधिकरणांच्या यंत्रणांनी सज्ज रहावे : आयुक्त सौरभ राव



ठाणे - मान्सूनच्या पार्श्वभूमीवर ठाणे शहरात विविध प्राधिकरणामार्फत सुरू असलेली सर्व कामे ही येत्या 30 मे पर्यंत पूर्ण करावीत. 30 मे नंतर कोणतेही काम घोडबंदर रोडवर सुरू राहणार नाही यासाठी महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष ठेवून सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण होतील या दृष्टीने संबंधित प्राधिकरणांशी समन्वय साधावा. आपत्ती काळात जलदगतीने नागरिकांना प्रतिसाद देण्याबाबतच्या सूचना देत असतानाच लोकप्रतिनिधीशी संपर्क ठेवण्याचे निर्देशही आज झालेल्या मान्सूनपूर्व आढावा बैठकीत महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी सर्व प्राधिकरणांना दिले.

नागरी संशोधन केंद्र येथे झालेल्या बैठकीस अतिरिक्त आयुक्त 1, संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, नगर अभियंता प्रशांत सोनग्रा, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाट, यांच्यासह महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमएमआरडीएचे अधिकारी, मेट्रो, महावितरण, महानगर गॅस, रेल्वे आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मान्सून कालावधीत नागरिकांना तात्काळ मदत मिळावी यासाठी नियंत्रण कक्ष, रेल्वे, कोस्ट गार्ड, पोलीस आणि महापालिकेतील सर्व विभागांनी परस्पर समन्वय ठेवणे. पावसाळयात कोणतीही आपत्ती उद्भवल्यास एकमेकांवर आरोप करु नयेत. सर्व यंत्रणांनी अलर्ट मोडवर रहावे. भरतीच्या वेळांवर लक्ष ठेवून ज्या दिवशी जास्त उंचीच्या लाटा असतील त्या दिवशी आवश्यक त्या उपाययोजनांसह यंत्रणांनी सज्ज रहावे. तसेच सर्व विभागांचेआपत्ती व्यवस्थान कक्ष 24x7 कार्यान्वित ठेवण्याच्या सूचनाही आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या.

सदर बैठकीत अतिवृष्टी, भरती, पूरसदृश्य परिस्थिती, तसेच खड्डे दुरूस्ती, सखल भागात साचणारे पाणी, पंपिंग स्टेशन, रस्ते दुरुस्ती, वाहतूक व्यवस्थापन आणि आपत्कालीन प्रतिसाद यावर विशेष भर देण्यात आला. रेल्वे प्रशासनाने स्थानक परिसरातील पाणी निचरा, प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना आणि आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देण्याबाबत माहिती दिली. स्टेशन परिसरात ब्लिंकर, रिफ्लेक्टर आणि दिशादर्शक फलक बसवण्याबाबतही सूचना करण्यात आल्या. नागरिकांना वेळेत सूचना मिळाव्यात यासाठी विविध विभागांचे अधिकारी सतत संपर्कात राहून सामूहिक समन्वयाने काम करतील. तसेच मान्सून कालावधीत सर्व अधिकाऱ्यांनी आपले भ्रमणध्वनी सुरू ठेवावेत असे आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले.

**खड्डा पडल्यास तात्काळ दुरूस्ती करावी -** अतिवृष्टीच्या काळात रस्त्यावर खड्डा पडल्यास तो तातडीने दुरुस्त करण्यात यावा. रस्ता कोणत्याही प्राधिकरणाच्या अखत्यारितील असला तरी नागरिकांना त्रास होवू नये यासाठी मान्सून कालावधीत खड्डा दुरूस्त करण्याची कार्यवाही ठाणे महापालिका करेल असेही आयुक्तांनी नमूद केले. तसेच खड्ड्यांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही व्हावी यासाठी यासाठी प्रत्येक विभागात समन्वय अधिकारी नेमावा तसेच सर्व विभागांनी व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून तात्काळ समन्वय साधून माहितीची देवाणघेवाण ठेवावी, असेही बैठकीत नमूद करण्यात आले.

**सखल भागातील पंप कायान्वित असतील याची दक्षता घ्यावी -** दरवर्षी ज्या सखल भागात पाणी साचते त्या ठिकाणी पंप बसविण्यात येणार आहे. या सखल भागाची यादी तयार करावी. पावसाळ्यात सदर ठिकाणचे पंप पूर्ण क्षमतेने कार्यरत राहतील याची खात्री करावी. तसेच प्रत्येक प्रभागात पाणी साचण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी हायड्रा मशीन, पंपिंग यंत्रणा व मनुष्यबळ सज्ज ठेवण्याच्या सूचनाही आयुक्तांनी दिल्या.

**कोस्टल रोडचे काम सुरू असलेल्या ठिकाणी दक्षता घ्यावी -** कोस्टल रोडचे काम सुरू असलेल्या ठिकाणी मान्सून कालावधीत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी, कोस्टल रोडचे कामालगत असलेल्या वस्तीत पाणी साचणार नाही याकरिता आवश्यक उपाययोजना कराव्यात. मान्सून कालावधीत दर 15 दिवसांनी कोस्टल रोडचे काम सुरू असलेल्या ठिकाणी ठाणे महापालिका व एमएमआरडीच्या अभियंत्यांनी संयुक्त पाहणी करण्याच्या सूचनाही आयुक्त सौरभ राव यांनी बैठकीत दिल्या.

**स्ट्रीट पोल व उघड्या केबल्सची तपासणी करावी -** शहरातील स्ट्रीट पोल तसेच ज्या ठिकाणी उघड्या अवस्थेत असलेल्या केबल्सची तपासणी करावी. आपत्ती दरम्याने विजेचा पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घेणे व खंडीत झाल्यास लवकरात लवकर वीजेचा पुरवठा पूर्ववत करण्याबाबत दक्षता घ्यावी. शॉर्टसर्किटमुळे आग किंवा अन्य कोणती आपत्ती वीजेशी संबंधित असल्यास घटनास्थळी उपस्थित रहावे.

**रुग्णालयात पुरेसा औषधसाठा उपलब्ध करावा -** छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयात साथीच्या रोगांवर उपाययोजना व पावसाळी आजारांवर औषधसाठा उपलब्ध करावा. रुग्णालयामध्ये बेडस् उपलब्ध ठेवावेत. पुरेशा प्रमाणात औषधे, पॅरामेडीकल स्टाफ तयार ठेवण्याच्या सूचनाही या बैठकीत देण्यात आल्या

**कंट्रोल रूम सज्ज ठेवावा -** मान्सून कालावधीत सर्व परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी नियंत्रण कक्ष (कंट्रोल रूम) अधिक सक्षम करण्यात येणार असून, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचनाही आयुक्तांनी दिल्या आहेत. तसेच प्रभागसमिती निहाय नियंत्रण कक्ष तयार करण्याच्या सूचनाही संबंधित सहायक आयुक्तांना देण्यात आल्या.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME FROM **RASBIR KAUR BOMRAH** TO **RASBIR KAUR NOTEY** AS PER AFFIDAVIT. RESIDING AT A-76, KALPATARU IMMENSA, KALPATARU PARK CITY, OPPOSITE NAMO GRAND CENTRAL PARK, KOLSHET ROAD, SANDOZBAUGH, THANE WEST – 400607.

## NEET परीक्षा रद्द

**(पान 1 वरून )**देशातील सुमारे 22 लाख विद्यार्थ्यांनी यंदा 3 मे 2026 रोजी नीटची परीक्षा दिली होती, त्यामध्ये महाराष्ट्रातील जवळपास अडीच लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. मात्र, देशभरात 42 तास अगोदरच या पेपरची प्रश्नपत्रिका बाहेर आल्याने पेपर फुटला होता. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय परीक्षा यंत्रणेकडून हा परीक्षा निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

परीक्षेची नवी तारीख लवकरच जाहीर

पेपरीफुटीमुळे नीटची परीक्षा रद्द करण्यात आली असून सीबीआयमार्फत याप्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे. देशभरात गेल्याच आठवड्यात म्हणजेच 3 मे 2026 रोजी नीटची परीक्षा घेण्यात आली होती. आता, नव्या परीक्षेची तारीख लवकरच जाहीर होईल, त्यासाठी परीक्षार्थींचे परीक्षा केंद्र 3 मे रोजीचेच राहणार असून विद्यार्थ्यांना नव्याने रजिस्ट्रेशन करण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांकडून नव्या परीक्षेसाठी शुल्क घेतले जाणार नाही, मात्र नव्या परीक्षेसाठी नवे ओळखपत्र दिले जाणार आहे. विद्यार्थी,पालकांनी फक्त एनटीएच्या सूचनांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन केंद्राकडून करण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांमध्ये संताप, मानसिक आणि आर्थिक ताण वाढला

**(पान 2 वर ) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर आर्थिक ताण -** खेडेगावातील विद्यार्थ्यांसाठी ही परिस्थिती अधिक कठीण ठरत आहे. पुन्हा शहरात जाऊन राहणे, हॉस्टेलचा खर्च करणे, क्लासेस किंवा टेस्ट सिरीज जॉईन करणे, यासाठी अतिरिक्त आर्थिक भार सहन करावा लागणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही चिंता वाढली आहे.

दोन वर्षांची मेहनत सफल झाली असे वाटत असतानाच पुन्हा परीक्षा द्यावी लागणे खूप वेदनादायक आहे. वारंवार पेपर लीकच्या घटना घडत असतील, तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्या विश्वासाने तयारी करावी? ही केवळ परीक्षा व्यवस्थेची चूक नसून विद्यार्थ्यांच्या भविष्याशी आणि मानसिकतेशी खेळ आहे, असे मत सारंग गावडे यांनी व्यक्त केले.

## पेपरफुटी प्रकरणात मोठी आर्थिक देवाणघेवाण, 30 वर्षीय युवकास अटक

**(पान 1 वरून ) NEET पेपरफुटीत नाशिकमधून 30 वर्षीय युवकास अटक, हेअरस्टाईल बदलून फिरायचा; सीबीआय ॲक्शन मोडवर-** आता सीबीआयने तपासाला सुरुवात केली असून नाशिक ते राजस्थान व्हाया हरियाणा अशा पद्धतीने ही चैन असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, नाशिकमध्ये नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटली असून 30 वर्षीय युवकाला अटक करण्यात आली आहे. संशयित आरोपीने BAMS शिक्षण घेतले असल्याची माहिती असून तो मूळचा नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील रहिवासी आहे. राजस्थान CBI कडून मिळालेल्या माहितीनुसार नाशिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. आज दुपारी बारा वाजेच्या सुमारास संशयिताला ताब्यात घेण्यात आले असून त्याची कसून चौकशी सुरू आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, नाशिक पोलिसांनी आरोपीचे नाव, मोबाईल नंबर आणि पत्त्याच्या आधारे त्याचा शोध घेत अटक केली, संबंधित युवकाची मेडिकल काऊन्सलिंग एजन्सी आहे. नीट प्रकरणातील पेपरफुटी प्रकरणानंतर आरोपीने पोलिसांपासून बचावासाठी हेअरस्टाईल बदलल्याचे प्राथमिक तपासातून उघड झालं आहे.

**नाशिकमधून हरियाणात पोहोचली प्रश्नपत्रिका -** NEET पेपर लीक प्रकरणात महत्त्वाची माहिती समोर आली असून प्रश्नपत्रिका लीक झाल्यानंतर पहिली कॉपी नाशिकमध्ये समोर आली. नाशिकमधील ही लीक प्रश्नपत्रिका हरियाणात पोहोचली, येथे फुटलेल्या पेपरचे 10 सेट तयार करण्यात आले. त्यानंतर, हरियाणातून बिहार, आंध्र प्रदेश, जम्मू आणि काश्मीरपर्यंत नीटची प्रश्नपत्रिका सहजपणे पोहोचल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे, नीट परीक्षेसाठी काम करणाऱ्या संस्था आणि एजन्सीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झालं आहे. दरम्यान, नीट पेपर फुटीच्या प्रकरणाचा तपास आता देशातील सर्वात सक्षम तपास यंत्रणा असलेल्या सीबीआयकडे देण्यात आला आहे.

**राजस्थानमध्ये 13 जणांचा चौकशी -** सीबीआयकडून हे प्रकरण गंभीरतेनं घेण्यात आलं असून तातडीने कारवाईची चक्रे फिरली आहेत. आतापर्यंतच्या तपासानुसार, जयपूरमध्ये अटक करण्यात आलेला मनीष हाच या संपूर्ण प्रकरणामागील मुख्य सूत्रधार असल्याचे दिसून येते. प्रश्नपत्रिका छपाईला जाण्यापूर्वीच, परीक्षेतील संभाव्य प्रश्न मिळवून त्याने हे कांड केले. 3 मे रोजी पार पडलेल्या परीक्षेदरम्यानच ही प्रश्नपत्रिका फुटल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी CBI लवकरच पुढील कारवाई सुरू करेल अशी अपेक्षा आहे. सध्या राजस्थानच्या SOG च्या ताब्यात असलेल्या 13 व्यक्तींची CBI चौकशी करणार आहे.

**पेपरफुटी प्रकरणात मोठी आर्थिक देवाणघेवाण, संशयिताने 10 लाखांना प्रश्नपत्रिका घेतली अन्...; धक्कादायक माहिती समोर -** देशभरातील वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी नीट (NEET) परीक्षा यंदा पेपरफुटीच्या वादंगात अडकली आहे. या प्रकरणाचे धागेदोरे आता थेट नाशिकपर्यंत पोहोचले असून, पोलिसांच्या तपासात अत्यंत खळबळजनक माहिती समोर आली आहे. नाशिकच्या (Nashik) एका 30 वर्षीय संशयित आरोपीने 10 लाख रुपयांना ही प्रश्नपत्रिका विकत घेतली होती आणि ती पुढे तब्बल 15 लाख रुपयांना विकल्याचे उघड झाले आहे.

तपास यंत्रणांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या पेपरफुटी प्रकरणात मोठ्या प्रमाणावर आर्थिक देवाणघेवाण झाली आहे. नाशिकच्या संशयित आरोपीने, ज्याची स्वतःची मेडिकल काऊन्सलिंग एजन्सी आहे, 10 लाख रुपये मोजून प्रश्नपत्रिका मिळवली. त्यानंतर नफ्याची संधी साधत त्याने हीच प्रश्नपत्रिका 15 लाख रुपयांना विकली. हा व्यवहार झाल्यानंतर ही प्रश्नपत्रिका इन्स्टाग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वणव्यासारखी पसरली, ज्यामुळे परीक्षेची गोपनीयता पूर्णपणे संपुष्टात आली.

## राष्ट्रवादी (श.प.) ने चालविले रस्त्यावर बैलगाड्या आणि टांगे

**(पान 1 वरून )** करणारे लाखो लोक बेरोजगार होतील, याचेही भान या सरकारला नाही. तेलाचे भाव गगनाला भिडले आहेत. तरीही, मंत्र्यांच्या 60-60 गाड्या फिरत आहेत. पार तमाशा केला आहे देशाचा ! यापुढे महागाई अधिकाधिक वाढणार आहे. चीन युद्धानंतर ज्या पद्धतीने फेकून दिलेली ज्वारी- बाजरी खावी लागली होती; तसेच धान्य ट्रम्प आपल्याला देणार आहे. वरून दमही देणार आहे. हे जर इराण - अमेरिका युद्धाने झाले आहे, असा दावा केला जात असेल तर कुणाची बाजू घ्यावी, हे समजायला नको का?संध्याकाळी आठ नंतर यायचे आणि घोषणा करायची; असे काय होते की आठ नंतरच नोटाबंदी, टाळ्या-थाळ्या आणि आता पेट्रोल घोषणा केल्या जात आहेत.

सध्या सर्वच प्रकारच्या कृतीवर जिहाद हे नाव दिले जात आहे, यावर विचारले असता डॉ.जितेंद्र आव्हाड म्हणाले की , हे सरकार आणि त्यांचे पाठिराखे मुस्लिम द्वेष निर्माण करीत आहेत. त्यांच्यात जर हिंमत असेल तर पेट्रोल- डिझेलवर बहिष्कार घाला. बैलगाडीतून , घोड्यावरून फिरा. पण, ते देखील गोरगरीब लोकांना परवडणार आहे का?, असा सवालही डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी केला.

दरम्यान, मनोज प्रधान यांनी, "दोन दिवसांपूर्वीच भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी परदेशी चलन वाचविण्याचे आवाहन भारतीयांना केले आहे. हे चलन वाचविण्यासाठी त्यांनी काही उपाय सूचविले आहेत. या उपायांचा अवलंब सत्ताधारी पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्काळ करणे गरजेचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनातून भारतातील तेलसाठा संपुष्टात आला असल्याचे कारण स्पष्ट होत आहे. आजरोजी ठाणे महानगर पालिकेचे पदाधिकारी, अधिकारी नियमितपणे खासगी वाहनांचा वापर करीत आहेत. या वाहनांचा इंधन खर्च ठाणे महानगर पालिकेकडून केला जात आहे. म्हणजेच, एका शासकीय संस्थेकडूनच परदेशी चलनाची उधळण केली जात आहे.

या आंदोलनात जिल्हा कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण, गटनेता अभिजीत पवार, महिला अध्यक्ष नगरसेविका मनिषा भगत, नगरसेविका पल्लवी जगताप, दीपाली भगत, मर्जिया पठाण, महिला कार्याध्यक्षा फुलाबानो पटेल, जिल्हा युवक कार्याध्यक्ष राजेश कदम, प्रशासन सरचिटणीस राजेश साटम, शमीम खान, कैलास हावळे, आशिष उमासरे, मिलिंद बनकर, सचिन पंधरे , माधुरी सोनार, मकसूद खान, शिवा कालू सिंह, जगत सिंह परोचा, बालेश हत्तिंबिरे, सचिन भातबरे, राकेश भगत, धर्मेंद्र अस्थाना, जैद खानचे, सोनाली कदम, दिपाली गावंड , सपना पाटील, आदी सहभागी झाले होते.

## लवकरच पावसाची एन्ट्री होण्याची शक्यता, तापमानातही बदल

**(पान 1 वरून )** मान्सूनच्या आगमनाचा अंदाज देत असताना, इतर राज्यांसाठी तारखांचा अंदाज देत नाही. डेटाच्या आधारे, मान्सूनच्या उत्तरेकडील प्रगतीचे मॅप केले जाते. त्यानुसार मान्सून 5 जून रोजी गोव्यात दाखल होऊन 6 जूनपर्यंत कोकणात पोहोचण्याची शक्यता आहे. 7 जूनपर्यंत पुण्यात येण्याचा अंदाज आहे. उल्लेखनीय म्हणजे, या वर्षीच्या मान्सूनच्या प्रारंभादरम्यान बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ तयार झाले नाही. ज्यामुळे मान्सून कोणत्याही व्यत्ययाविना प्रवाश करु शकतो. 2005 पासून, IMD सांख्यिकीय पद्धती वापरून केरळमध्ये मान्सूनच्या आगमन तारखेचा अंदाज वर्तवत आहे.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका, ठाणे अनुभवी निविदाकारांकडुन "गटार बांधणे" या लेखाशिर्षकांतर्गत वागळे प्रभाग समिती अंतर्गत १ यू व २ यू रोड येथे गटाराचे काम करणेच्या कामाकरिता ई-टेंडरींग पध्दतीने एकूण एक ऑनलाईन निविदा मागवित आहे. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय/निमशासकिय/सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम/ स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली/सुरू आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. कामाची सविस्तर निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे अधिकृत ई-निविदा संकेतस्थळ https://mahatenders.gov.in येथे दि.१३.०५.२०२६ ते दि.२०.०५.२०२६ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई-टेंडरींग पध्दतीने दि.२०.०५.२०२६ रोजी १६.०० पर्यंत स्विकारण्यात येतील व शक्य झाल्यास दि.२१.०५.२०२६ रोजी १६.०० वा उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी - वा.प्र.स/१३९/२०२६-२७ सही/-
दि:१२.०५.२०२६ कार्यकारी अभियंता
**Pls visit our oficial web-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्वगीय विलासराव देशमुख भवन, प्रभाग समिती क्र. ४, २ रा मजला,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पूर्व), ता. जि. ठाणे- ४०९ १०७. दुरध्वनी क्र. २८९०३४०९

जा.क्र.मनपा/ उद्यान / १९७ / २०२६-२७ दि. ११/०५/२०२६

// जाहीर निविदा सुचना //

मिरा भाईंदर महानगरपालिका उदयान विभागामार्फत खालील कामांकरिता दोन लिफाफा पध्दतीने दि. २०/०५/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. सदर कामाची अटीशर्तीसह निविदा N.I.C. (National informatics Centre, Pune) च्या https://mahatenders.gov.in संकेत स्थळावर उपलब्ध असुन सदर निविदा फॉर्म दि. १३/०५/२०२६ पासुन ते दि. २०/०५/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत (डाऊनलोड करुन) भरता येतील. मुदतीत आलेल्या निविदा दि. २२/०५/२०२६ रोजी दुपारी ०१.०० वाजता उपस्थित निविदाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष निविदा सेल मिरा भाईंदर महानगरपालिका येथे उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च | निविदा बयाणा रक्कम | नविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांबूची लागवडी करिता रोपे खरेदी करणे. | रु. २४,९६,०००/- (रु. चोवीस लाख शहन्नव हजार मात्र) | रु. २४.९६०/- (रु. चोवीस हजार नऊशे साठ मात्र) | रु. ५००+ ९० (GST) = ५९०/- (रु. पाचशे नंवद मात्र) (ना- परतावा) |

टिप :- १. निविदा दोन लिफाफा पध्दतीने सादर कराव्यात.
२. निविदा फॉर्म फि परत केली जाणार नाही.
३. आलेल्या निविदा मधील कोणतीही एक निविदा स्विकारण्याचा किंवा सर्वच निविदा नाकरण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवलेला आहे. त्याबददल कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.
४. निविदा विधी ग्राहयता कालावधी १२० दिवसांचा असेल.

जा.क्र.मनपा /मावज/ E-८९५२३२७ /२०२६-२७
दि. १२/०५/२०२६

सही/-
(कविता बोरकर)
उप-आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०




## भारत पेट्रोलियम

■ पदाचे नाव & तपशील:
1 ज्युनियर एक्झिक्युटिव्ह (Engineering)
2 ज्युनियर एक्झिक्युटिव्ह (Accounts)
3 ज्युनियर एक्झिक्युटिव्ह (Wayside Amenities)
4 सेक्रेटरी BPCL
5 असोसिएट एक्झिक्युटिव्ह (Quality Assurance)
6 असोसिएट एक्झिक्युटिव्ह (Official Language Implementation)
■ शैक्षणिक पात्रता: [Gen/OBC: 60% गुण, SC/ST/PWD: 55% गुण]
पद क्र.1: (i) इंजिनिअरिंग डिप्लोमा (Mechanical / Electrical / Instrumentation / Electronics/ Civil/ Chemical)
पद क्र.2: (i) पदवीधर (ii) Inter CA/ Inter CMA (iii) 05 वर्षे अनुभव
पद क्र.3: (i) B.Com/BBA /B.Sc / BMS / BHM (ii) 05 वर्षे अनुभव
पद क्र.4: (i) पदवीधर (ii) 05 वर्षे अनुभव
पद क्र.5: (i) M.Sc (Chemistry) (ii) 03 वर्षे अनुभव
पद क्र.6: (i) हिंदीमध्ये पदव्युत्तर पदवी (ii) 03 वर्षे अनुभव
■ वयाची अट: 01 एप्रिल 2026 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
पद क्र.1: 32 वर्षांपर्यंत
पद क्र.2: 30 ते 35 वर्षे
पद क्र.3: 32 वर्षांपर्यंत
पद क्र.4: 32 वर्षांपर्यंत
पद क्र.6: 35 वर्षांपर्यंत
पद क्र.6: 35 वर्षांपर्यंत
■ Fee: General/OBC/EWS: ₹1180/- [SC/ST/PWD: फी नाही]
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: 17 मे 2026
■ अधिकृत संकेतस्थळ- https://www.bharatpetroleum.in/index

## स्टाफ सिलेक्शन कमिशन

■ पदाचे नाव & तपशील:
1 स्टेनोग्राफर, ग्रेड 'C' (ग्रुप 'B') 731
2 स्टेनोग्राफर, ग्रेड 'D' (ग्रुप 'C')
■ शैक्षणिक पात्रता: (i) 12वी उत्तीर्ण. (ii) लघुलेखन कौशल्य अनिवार्य
■ वयाची अट: 01 ऑगस्ट 2026 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
पद क्र.1: 18 ते 30 वर्षे
पद क्र.2: 18 ते 27 वर्षे
■ Fee: General/OBC: ₹100/- [SC/ST/PWD/ExSM/महिला: फी नाही]
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 15 मे 2026 (11:00 PM)
■ अर्ज दुरुस्ती: 20 ते 21 मे 2026
■ संकेतस्थळ https://ssc.gov.in/

## SSC मार्फत हिंदी ट्रान्सलेटर

■ पदाचे नाव & तपशील:
1 ज्युनियर ट्रान्सलेशन ऑफिसर (JTO) 84
2 ज्युनियर ट्रान्सलेशन ऑफिसर (AFHQ)
3 ज्युनियर हिंदी ट्रान्सलेटर (JHT) / ज्युनियर ट्रान्सलेशन ऑफिसर (JTO) /ज्युनियर ट्रान्सलेटर (JT)
4 सिनियर हिंदी ट्रान्सलेटर (SHT) / सिनियर ट्रान्सलेटर (ST)/सिनियर ट्रान्सलेशन ऑफिसर (STO)
■ शैक्षणिक पात्रता: पद क्र.1, 2, 3: (i) इंग्रजी विषयासह हिंदी पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य (ii) हिंदी/इंग्रजी अनुवादात डिप्लोमा/प्रमाणपत्र किंवा 02 वर्षे अनुभव.
पद क्र.4: (i) इंग्रजी विषयासह हिंदी पदव्युत्तर पदवी किंवा समतुल्य (ii) हिंदी/इंग्रजी अनुवादात डिप्लोमा/प्रमाणपत्र किंवा 03 वर्षे अनुभव.
■ वयाची अट: 01 ऑगस्ट 2026 रोजी 18 ते 30 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ Fee: General/OBC/EWS: ₹100/- [SC/ST/ExSM/महिला: फी नाही]
Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 14 मे 2026 (11:00 PM)
■ अर्ज दुरुस्ती: 19 ते 20 मे 2026
■ संकेतस्थळ https://ssc.gov.in/

## केंद्रीय राखीव पोलीस दल

■ पदाचे नाव & तपशील:
1 कॉन्स्टेबल (ट्रेड्समन & टेक्निकल) 9175
2 कॉन्स्टेबल (पायोनियर विंग) 20
■ शैक्षणिक पात्रता: कॉन्स्टेबल (ड्रायव्हर): (i) 10वी उत्तीर्ण (ii) अवजड वाहन चालक परवाना
कॉन्स्टेबल (मेकॅनिक मोटर व्हेईकल): (i) 10वी उत्तीर्ण (ii) ITI (मेकॅनिक मोटर व्हेईकल) (iii) 01 वर्ष अनुभव
कॉन्स्टेबल (पायोनियर विंग): (i) 10वी उत्तीर्ण (ii) मेसनरी किंवा इलेक्ट्रिशियन ट्रेड मध्ये 01 वर्ष अनुभव. उर्वरित ट्रेड: 10वी उत्तीर्ण
■ शारीरिक पात्रता: प्रवर्ग उंची छाती
पुरुष महिला पुरुष
General/OBC 170 सें.मी. 157 सें.मी. 80 सें.मी. व फुगवून 5 सें. मी. जास्त
ST 162.5 सें. मी. 150 सें. मी. 76 सें. मी. व फुगवून 5 सें.मी. जास्त
■ वयाची अट: 01 जानेवारी 2026 रोजी, [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
कॉन्स्टेबल (ड्रायव्हर): 21 ते 27 वर्षे
उर्वरित ट्रेड: 18 ते 23 वर्षे
■ Fee: General/OBC/EWS: ₹100/- [SC/ST/ExSM/महिला: फी नाही]
■ शेवटची तारीख: 19 मे 2026
■ संकेतस्थळ https://crpf.gov.in/

## युनियन बँक ऑफ इंडिया

■ पदाचे नाव : 1 अप्रेंटिस 1865
■ शैक्षणिक पात्रता: पदवीधर
वयाची अट: 01 एप्रिल 2026 रोजी 20 ते 28 वर्षे [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
■ Fee: General/OBC: ₹944/- [SC/ST/PWD: ₹236/-, महिला: ₹708/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
■ शेवटची तारीख: 19 मे 2026
■ वेबसाइट https://www.unionbankofindia.bank.in/en/home

## आदिवासी विकास विभाग

■ पदाचे नाव & तपशील:
1 चौकीदार (Watchman) 416
■ शैक्षणिक पात्रता: 10वी उत्तीर्ण
वयाची अट: 01 एप्रिल 2026 रोजी 18 ते 38 वर्षे [मागासवर्गीय: 05 वर्षे सूट]
■ Fee: अमागास: ₹1000/- [मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ/दिव्यांग:₹900/-, माजी सैनिक: फी नाही]
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 18 मे 2026 (11:55 PM)
■ वेबसाइट https://tribal.maharashtra.gov.in/1001/%e0%a4%ae%e0%a5%81%e0%a4%96%e0%a5%8d%e0%a4%af-%e0%a4%aa%e0%a5%83%e0%a4%b7%e0%a5%8d%e0%a4%a0

## नाशिक येथील चलन नोट मुद्रणालय

■ पदाचे नाव & तपशील:
1 वेल्फेअर ऑफिसर
2 सेफ्टी ऑफिसर
3 सुपरवायझर (टेक्निकल कंट्रोल)
4 सुपरवायझर (TO – प्रिंटिंग)
5 सुपरवायझर (IT)
6 सुपरवायझर (TO – मेकॅनिकल)
7 सुपरवायझर (TO – AC)
8 सुपरवायझर (TO – इलेक्ट्रिकल)
9 सुपरवायझर (TO – इलेक्ट्रॉनिक्स)
10 सुपरवायझर (इंक फॅक्टरी)
11 सुपरवायझर (मेकॅनिकल / एअर कंडिशनिंग)
12 सुपरवायझर (इलेक्ट्रिकल / इलेक्ट्रॉनिक्स)
13 सुपरवायझर (TO – सिव्हिल)
14 सुपरवायझर (TO – इन्स्ट्रुमेंटेशन)
15 सुपरवायझर (ऑफिशियल लँग्वेज)
16 सेक्रेटेरियल असिस्टंट
17 आर्टिस्ट (ग्राफिक डिझाईन)
18 ज्युनियर ऑफिस असिस्टंट
19 ज्युनियर टेक्निशियन (प्रिंटिंग)
20 ज्युनियर टेक्निशियन (कंट्रोल)
21 ज्युनियर टेक्निशियन (इलेक्ट्रिकल)
22 ज्युनियर टेक्निशियन (इलेक्ट्रॉनिक्स)
23 ज्युनियर टेक्निशियन (मशीनिस्ट)
24 ज्युनियर टेक्निशियन (फिटर)
25 ज्युनियर टेक्निशियन (मेकॅनिक मशीन टूल मेंटेनन्स / फिटर)
26 ज्युनियर टेक्निशियन (इलेक्ट्रॉनिक्स / इन्स्ट्रुमेंटेशन)
27 ज्युनियर टेक्निशियन (स्टोअर)
28 ज्युनियर टेक्निशियन (एअर कंडिशनिंग)
29 ज्युनियर टेक्निशियन (इंक फॅक्टरी – अटेंडंट ऑपरेटर)
30 ज्युनियर टेक्निशियन (इंक फॅक्टरी – लॅबोरेटरी असिस्टंट)
31 ज्युनियर टेक्निशियन (मेकॅनिकल / एअर कंडिशनिंग)
32 ज्युनियर टेक्निशियन (इलेक्ट्रिकल / इलेक्ट्रॉनिक्स)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.1: प्रथम श्रेणी BE.B.Tech + 05 वर्षे अनुभव किंवा B.Sc (Physics/Chemistry) + इंडस्ट्रियल सेफ्टी डिप्लोमा + 05 वर्षे अनुभव
पद क्र.2: MA (Social Work) / M.S.W किंवा समतुल्य
पद क्र.3: प्रथम श्रेणी प्रिंटिंग टेक्नोलॉजी / प्रिंटिंग & पॅकेजिंग टेक्नोलॉजी डिप्लोमा/पदवी
पद क्र.4: प्रथम श्रेणी प्रिंटिंग टेक्नोलॉजी /प्रिंटिंग & पॅकेजिंग टेक्नोलॉजी डिप्लोमा/पदवी
पद क्र.5: प्रथम श्रेणी IT/कॉम्प्युटर सायन्स डिप्लोमा /पदवी
पद क्र.6: प्रथम श्रेणी मेकॅनिकल डिप्लोमा / पदवी
पद क्र.7: प्रथम श्रेणी AC इंजिनिअरिंग डिप्लोमा /पदवी
पद क्र.8: प्रथम श्रेणी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग डिप्लोमा /पदवी
पद क्र.9: प्रथम श्रेणी इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग डिप्लोमा /पदवी
पद क्र.10: प्रथम श्रेणी इंजिनिअरिंग डिप्लोमा/पदवी (Dyestuff Technology /Paint Technology/Surface Coating Technology/Printing Ink Technology/ Printing Technology) किंवा B.Sc. (Chemistry)
पद क्र.11: प्रथम श्रेणी मेकॅनिकल/AC इंजिनिअरिंग डिप्लोमा /पदवी
पद क्र.12: प्रथम श्रेणी इलेक्ट्रिकल/ इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग डिप्लोमा /पदवी
पद क्र.13: प्रथम श्रेणी सिव्हिल इंजिनिअरिंग डिप्लोमा /पदवी
पद क्र.14: प्रथम श्रेणी इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग डिप्लोमा /पदवी
पद क्र.15: हिंदी/इंग्रजी पदव्युत्तर पदवी (ii) ट्रान्सलेशनचा 01 वर्ष अनुभव
पद क्र.16: 55 गुणांसह पदवीधर (ii) इंग्रजी/ हिंदी स्टेनोग्राफी 80 श.प्र.मि. व इंग्रजी/हिंदी टायपिंग 40 श.प्र.मि
पद क्र.17: फाईन आर्ट्स / व्हिज्युअल आर्ट्स / व्होकेशनल (ग्राफिक्स) पदवी
पद क्र.18: कोणत्याही शाखेतील पदवी (ii) संगणकावर इंग्रजी 40 श.प्र.मि/हिंदी टायपिंग 30 श.प्र.मि
पद क्र.19: ITI (Machinist/Electrical/ Fitter/Electronics/Printing Trades i.e. Litho Offset machine minder/ Electroplating/ Letter Press machine minder/ Offset Printing / plate making/ plate maker cum-imposito)
पद क्र.20: ITI (Machinist/Electrical/ Fitter/Electronics/Printing Trades i.e. Litho Offset machine minder/ Electroplating/ Letter Press machine minder/ Offset Printing / plate making/ plate maker cum-imposito)
पद क्र.21: ITI (Electrical)
पद क्र.22: ITI (Electronics)
पद क्र.23: ITI (Machinist)
पद क्र.24: ITI (Fitter)
पद क्र.25: ITI (MMTM/Fitter)
पद क्र.26: ITI (Electronic Mechanic / Instrument Mechanic)
पद क्र.27: ITI (Machinist/Electrical/ Fitter/Electronics/Printing Trades i.e. Litho Offset machine minder/ Electroplating/ Letter Press machine minder/ Offset Printing / plate making/ plate maker cum-imposito)
पद क्र.28: ITI (Air Conditioning)
पद क्र.29: ITI (Attendant Operator- Chemical Plant)
पद क्र.30: ITI (Laboratory Assistant- Chemical Plant)
पद क्र.31: ITI (Fitter/ Air Conditioning)
पद क्र.32: ITI ( Electrical/Electronics)
वयाची अट: 19 मे 2026 रोजी [SC/ST: 05 वर्षे सूट, OBC: 03 वर्षे सूट]
पद क्र.1 ते 15: 18 ते 30 वर्षे
पद क्र.16, 17 & 18: 18 ते 25 वर्षे
पद क्र.19 ते 32: 18 ते 25 वर्षे
■ नोकरी ठिकाण: नाशिक, मध्य प्रदेश & हैदराबाद
■ Fee: General/OBC/EWS: ₹1180/- [SC/ST/PWD: ₹200/-]
■ अर्ज करण्याची पद्धत: Online
महत्त्वाच्या तारखा:
■ Online अर्ज करण्याची शेवटची तारीख: 19 मे 2026
■ परीक्षा: नंतर कळविण्यात येईल.
■ अधिकृत वेबसाइट https://cnpnashik.spmcil.com/hi/


# गरम होतंय म्हणून गारेगार सोडा पिताय? सावधान! आरोग्यावर होतील दुष्परिणाम

उन्हाळ्यात बहुतेक लोक इतर पेयांपेक्षा सोडा पिणे पसंत करतात. सोड्याची लोकप्रियता पाहता, बरेच लोक आहारासोबतदेखील सोडा पितात. कारण त्यात साखरेचे प्रमाण फारच कमी आहे. परंतु, आपल्याला हे जाणून आश्चर्य वाटेल की, सोडा आपल्या आरोग्यासाठी हानिकारकदेखील आहे.
त्यात अनेक प्रकारची रसायने आढळतात, जी शरीरासाठी हानिकारक असू शकतात.
दररोज सोडा प्यायल्यामुळे केवळ वजनच वाढत नाही, तर त्याचा परिणाम हृदय आणि रोगप्रतिकारक शक्तीवरदेखील होतो. रोज सोडा प्यायल्याने शरीरातील हाडे कमकुवत होण्याप्रमाणेच अनेक त्रासांना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत तुम्हीही रोज सोडा पित असाल, तर ही बातमी वाचाच
वरिष्ठ सल्लागार डॉ. ऋचा चतुर्वेदी यांनी द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे.
दाह वाढवण्यास कारणीभूत सोड्यामुळे शरीरात केवळ जळजळच होत नाही, तर त्याचा रोगप्रतिकारशक्तीवरही विपरीत परिणाम होतो.
त्याव्यतिरिक्त जीवघेणा आजार होण्याचा धोकाही वाढतो. या अभ्यासात असे दिसून आले आहे की, जे लोक दररोज सोडा पितात त्यांच्या शरीरात युरिक आम्ल जास्त प्रमाणात वाढलेले असते; जे शरीराचा दाह वाढवते.
हाडे कमकुवत होण्यास चालना जे लोक जास्त सोडा पितात, त्यांची हाडे कमकुवत होऊ लागतात. कारण सोड्यात आढळणारे फॉस्फरिक ॲसिड शरीरातून कॅल्शियम हळूहळू काढून टाकते.
मुतखडा ही एक अशी सामान्य समस्या आहे जी कोणालाही होऊ शकते. या स्टोनचा आकार लहान किंवा मोठा असू शकतो. शिवाय स्टोन हा एक असू शकतो किंवा एकापेक्षा जास्त असू शकतो. झिरो शुगर सोडा प्यायल्यानं याचाही धोका वाढतो. सोडा प्यायल्यानं भूक लागण्याचे प्रमाण वाढते आणि त्यामुळे वजन वाढते.
हृदयरोगाचा धोका
रोज सोडा प्यायल्याने हृदयविकाराचा धोका वाढतो. त्यामुळे रोज सोडा पिणे टाळावे.
सोड्याऐवजी फळांचा रस प्या
सकाळी रिकाम्या पोटी रस पिणे टाळावे, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. सकाळी रिकाम्या पोटी ज्यूस प्यायल्याने पोटातील सिडिटीची समस्या वाढू शकते, त्यामुळे काही खाल्ल्यानंतरच रस प्यावा. दुपारी रस पिणे फायदेशीर आहे.

संपादक : गणेश चंद्रकांत भोईटे



# थराराचा बादशाह 'राव बहादूर'ची रिलीज डेट जाहीर!





महेश बाबू आणि नम्रता शिरोडकर यांच्या जीएमबी एंटरटेनमेंटने ए प्लस एस मूव्हीज आणि श्रीचक्रास एंटरटेनमेंट्स सोबत मिळून दिग्दर्शक वेंकटेश महा यांच्या बहुप्रतीक्षित मानसशास्त्रीय थरारपट 'राव बहादूर'च्या जागतिक प्रदर्शनाची अधिकृत घोषणा केली आहे.
महेश बाबू प्रस्तुत आणि प्रसिद्ध दिग्दर्शक वेंकटेश महा यांच्या दिग्दर्शनाखाली तयार होत असलेला 'राव बहादूर' हा भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात रोमांचक चित्रपटांपैकी एक मानला जात आहे. या चित्रपटाची घोषणा झाल्यापासूनच प्रेक्षकांमध्ये याबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.
चित्रपटाच्या झलक व्हिडिओने एका वेगळ्या, गूढ आणि आकर्षक विश्वाची ओळख करून दिली असून, पडद्यावर नेहमी दिसणाऱ्या गोष्टींपेक्षा हा अनुभव पूर्णपणे वेगळा असल्याचे जाणवते. सत्य देव यांच्या प्रभावी रूपांतराने सजलेल्या या झलक व्हिडिओने आपल्या वेगळ्या शैलीमुळे आणि कथनपद्धतीमुळे प्रेक्षकांची मोठी पसंती मिळवली असून समाजमाध्यमांवरही त्याची जोरदार चर्चा रंगली आहे.
आता या चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिक वाढवत निर्मात्यांनी अधिकृतपणे प्रदर्शनाची तारीख जाहीर केली आहे. 'राव बहादूर' हा चित्रपट 3 जुलै 2026 रोजी जगभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार असून, यंदाच्या वर्षातील सर्वाधिक प्रतिक्षेत असलेल्या चित्रपटांपैकी तो एक ठरत आहे.
"संशय हाच राक्षस आहे" या संकल्पनेवर आधारित असलेल्या 'राव बहादूर'च्या झलक व्हिडिओने प्रेक्षकांना एका भयावह आणि अनोख्या जगाची सफर घडवली आहे.
मानसशास्त्रीय नाट्य आणि गूढ वास्तववाद यांच्या संगमातून तयार झालेला हा चित्रपट वास्तव आणि अंधार यांच्या संघर्षात अडकलेल्या एका व्यक्तीच्या भावनिक पतनाची कथा मांडताना दिसतो.

# सीएसकेच्या खेळाडूकडून विश्वविक्रमाची बरोबरी

### अवघ्या 13 चेंडूंत आयपीएलमध्ये अर्धशतक

नवी दिल्ली : चेन्नईच्या एम.ए. चिदंबरम स्टेडियमवर चेन्नई सुपर किंग्ज आणि लखनऊ सुपर जायंट्स यांच्यात आयपीएलचा 53 वा सामना खेळवला जात आहे. या सामन्यात सीएसकेचा खेळाडू उर्विल पटेल (urvil patel) याने आयपीएलमध्ये वेगवान अर्धशतक मारण्याच्या विश्वविक्रमची बरोबरी केली आहे.
लखनऊ संघाकडून मिळालेल्या धावांचा पाठलाग करताना सीएसके संघाला सलामीवीर संजू सॅमसनच्या रूपाने पहिला धक्का बसला. संजू सॅमसन 14 चेंडूंमध्ये 28 धावांची खेळी करून बाद झाला. यानंतर तिसऱ्या क्रमांकावर उर्विल पटेल फलंदाजीसाठी मैदानात उतरला. उर्विल पटेल याने पहिल्याच चेंडूवर एक धाव घेतली. मात्र त्यानंतर त्याने चौकार-षटकारांची बरसात करण्यास सुरुवात केली. उर्विलने आवेश खानच्या षटकादरम्यान सलग तीन षटकार ठोकले. पण तो तिथेच थांबला नाही, तर त्याने त्यानंतरच्या आणखी दोन चेंडूंवर दोन षटकार मारत आवेश खानच्या षटकादरम्यान, पाच षटकार लगावले. यानंतर उर्विलने एक चौकार लगावला. तसेच सहाव्या षटकात उर्विलने आणखी एक षटकार ठोकला.
उर्विलने अवघ्या 13 चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. असे करून त्याने आयपीएलच्या इतिहासातील सर्वात वेगवान अर्धशतक मारणाऱ्या यशस्वी जैस्वालच्या विक्रमाची बरोबरी केली आहे. मात्र उर्विल पटेल फलंदाजीपेक्षा अर्धशतकानंतर त्याने केलेले सेलिब्रेशन चर्चेत आले आहे. कारण उर्विल पटेल याने अर्धशतकानंतर आपल्या खिशातून कागदाची एक छोटी चिठ्ठी बाहेर काढली, ज्यावर "हे तुझ्यासाठी आहे, बाबा." हा भावुक संदेश लिहिला होता. हा क्षण सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत आहे. दरम्यान, उर्विल पटेल याने 23 चेंडूंत 65 धावांची खेळी खेळली. त्याच्या खेळीच्या जोरावर सीएसकेने लखनऊचा 5 विकेट्स राखून पराभव केला.



छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा 2026

# मानाच्या राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी बदलापूर सज्ज

ठाणे : प्रतिष्ठेच्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी बदलापूर शहर सज्ज झाले असून १३ ते १७ मे २०२६ कालावधीत होणाऱ्या या स्पर्धेसाठी राज्यतील ८ विभागातील ३८४ खेळाडूंचा थरार रंगणार आहे.
क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन व कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते १३ मे रोजी सायं. ६ वाजता हेंद्रेपाडामधील बदलापूर जिमखाना मैदानावर होईल. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार , कुळगाव-बदलापूर नगरपरिषदच्या नगराध्यक्षा श्रीमती रूचिता घोरपडे, क्रीडा सचिव रणजीतसिंह देओल, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, क्रीडा आयुक्त श्रीमती शीतल तेली -उगले आदी मान्यवर उपस्थित रहाणार आहेत.
तब्बल २ वर्षांनंतर होणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी राज्यभरातील खेळाडूंचे आगमन बदलापूर नगरीत झाले आहे. ८ विभागातील ३८४ खेळाडू, ३२ मार्गदर्शक, ३२ व्यवस्थापक, एकूण ४४८ जणांचे पथक स्पर्धेसाठी सज्ज झाले आहे. स्पर्धेत कोल्हापूर, लातूर, अमरावती, संभाजीनगर, पुणे, नागपूर, मुंबई व नाशिक या संघात चुरशीच्या लढती रंगणार आहे. १८ व २१ वर्षांखालील युवकांचा व्हॉलीबॉलचा थरार प्रथमच बदलापूरमध्ये पहाण्यास मिळणार आहे.
मंगळवारी स्पर्धा आढावा बैठकीनंतर कुळगाव-बदलापूर नगरपरिषदच्या नगराध्यक्षा श्रीमती रूचिता घोरपडे यांनी मैदानाची पाहणी केली.यावेळी मुख्याधिकारी मारूती गायकवाड, नगरसेवक किरण भोईर, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे सचिव निलेश जगताप व ठाणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन पदाधिकारी उपस्थित होते.

### भव्य उद्घाटन सोहळ्यात महाराष्ट्रांच्या परंपरेचे दर्शन

"संध्याकाळच्या सत्रात ४ मैदानात रंगणाऱ्या स्पर्धेतील अडीच हजारपेक्षा अधिक क्षमतेची गॅलरी तयार करण्यात आली आहे. स्पर्धेचे भव्य उद्घाटन १३ मे रोजी सायं. ६ वाजता होणार असून शाहिर नंदेश उमप यांच्या सांस्कृतिक मेजवानीसह जिमनॅस्टीकची चित्तथरारक प्रात्यक्षिके उद्घाटन सोहळ्याचे मुख्य आकर्षण असणार आहे.



पहिली छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा १५ ते २१ मे २०११ दरम्यान पुण्यातील बालेवाडी येथे पार पडली. गत दोन वर्षांपूर्वी बुलढाणा येथे स्पर्धा झाली. आता तब्बल २ वर्षांच्या प्रतिक्षेनंतर बदलापूर नगरीत व्हॉलीबॉलचा उत्सव रंगणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना २३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे व करंडक, पदके देणार येणार आहे. साखळी स्पर्धेतील प्रत्येक सामन्यातील विजयी व पराभूत संघ, उपांत्य फेरीतील प्रत्येक विजयी व पराभूत संघ, अंतिम फेरीतील विजयी संघ व अंतिम फेरीतील उपविजयी संघाला रोख बक्षिसे देण्यात येणार असल्याची माहिती उपसंचालक नवनाथ फरताडे यांनी दिली आहे.


# ठाणे महापालिका कर्मचाऱ्यांना कोरोना भत्त्याची अजूनही प्रतीक्षा!

## भाजप नगरसेविका नम्रता कोळी यांचा महासभेत प्रश्न

ठाणे (गणेश भोईटे) : कोरोना आपत्तीच्या काळात जीव धोक्यात घेऊन कार्य करणाऱ्या महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना तब्बल ४ वर्षांनंतरही कोरोना भत्त्याची प्रतीक्षा आहे. ठाणे महापालिका प्रशासनाकडून कर्मचाऱ्यांना भत्ता देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केल्यानंतरही दखल घेतली जात नसल्यामुळे भाजपच्या नगरसेविका नम्रता जयेंद्र कोळी यांनी शुक्रवारी होणाऱ्या महासभेत कोरोना भत्ता देण्याबाबत प्रश्न सादर केला आहे.

> “कोरोना आपत्तीच्या काळात, महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवेबरोबरच विविध विभागांमध्ये काम करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती. ठिकठिकाणच्या वस्त्यांच्या सर्वेक्षणाबरोबरच आरोग्य तपासणी, रुग्णालयातील सेवा आणि इतर कामांसाठी महापालिकेचे कर्मचारी कार्यरत होते. या काळात दुर्दैवाने कोरोना विषाणूचा संसर्ग झाल्यानंतर काही कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला होता. तर अनेक जण कोरोना संसर्गामुळे आजारी पडले होते. त्यांना अजूनही शारिरीक व्याधींना सामोरे जावे लागत आहे.

कोरोना आपत्तीच्या काळात केंद्र, राज्य आणि महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना कार्य केल्याबद्दल कोरोना भत्ता जाहीर करण्यात आला होता. मात्र, त्याचा लाभ ठाणे महापालिकेतील एकाही कर्मचाऱ्याला झालेला नाही. जीव धोक्यात घालून कार्य केल्यानंतरही पालिकेच्या कर्मचाऱ्यांना मिळणारी सापत्नभावाची वागणूक संतापजनक आहे. ठाणे महापालिकावगळता मुंबई महानगर क्षेत्रातील मुंबईसह अन्य महापालिकांनी कर्मचाऱ्यांना कोरोना भत्त्याचे वाटप केले आहे. मात्र, त्यात ब' वर्गात समावेश असलेल्या ठाणे महापालिकेचा समावेश नाही. या संदर्भात भाजपच्या नगरसेविका नम्रता कोळी यांच्याकडून शुक्रवारी (ता. १५) होणाऱ्या महासभेत प्रश्न सादर करण्यात आला



आहे. त्यात कोरोना भत्ता देण्याबाबत प्रशासनाच्या भूमिकेबाबत विचारणा करण्यात आला.

दरम्यान, या प्रश्नाबाबत सातत्याने स्थायी समिती व महापालिका प्रशासनाकडे पत्रव्यवहाराद्वारे आवाज उठविण्यात आला. परंतु, त्याची दखल घेण्यात आलेली नाही, याबद्दल नगरसेविका नम्रता कोळी यांनी खंत व्यक्त केली. या प्रश्नाबाबत आता निर्णय घेण्याबाबत पुढाकार घेण्यासाठी महापौर शर्मिला पिंपळोलकर व आयुक्त सौरभ राव यांना विनंतीपत्र पाठविण्यात आले आहे

■ शपथपत्रातील कथित खोटी माहितीप्रकरणी न्यायालयात इलेक्शन पिटीशन दाखल

# दिव्यातील शिंदे गटाच्या नऊ नगरसेवकांवर अपात्रतेची टांगती तलवार

दिवा : ठाणे महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक 2026 मध्ये दिवा परिसरातून निवडून आलेल्या शिंदे गटाच्या काही नगरसेवकांविरोधात निवडणूक शपथपत्रात कथितरित्या चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती सादर केल्याप्रकरणी न्यायालयात इलेक्शन रिट पिटीशन दाखल करण्यात आल्याची माहिती ॲड. रोहिदास मुंडे यांनी दिली.

संबंधित नगरसेवकांनी आपल्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात मालमत्ता, बांधकामे, आर्थिक माहिती तसेच इतर आवश्यक बाबींची संपूर्ण माहिती जाहीर न केल्याचा आरोप याचिकेमध्ये करण्यात आला आहे. काही ठिकाणी अनधिकृत बांधकामे व मालमत्ता लपविल्याचाही मुद्दा न्यायालयासमोर मांडण्यात आला असल्याचे समजते.



*■ संबंधित नगरसेवकांनी आपल्या निवडणूक प्रतिज्ञापत्रात मालमत्ता, बांधकामे, आर्थिक माहिती तसेच इतर आवश्यक बाबींची संपूर्ण माहिती जाहीर न केल्याचा आरोप याचिकेमध्ये करण्यात आला आहे. काही ठिकाणी अनधिकृत बांधकामे व मालमत्ता लपविल्याचाही मुद्दा न्यायालयासमोर मांडण्यात आला असल्याचे समजते.*

*■ मुंबई उच्च न्यायालय तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांनुसार निवडणूक शपथपत्रात चुकीची अथवा अपूर्ण माहिती देणे हे गंभीर स्वरूपाचे प्रकरण मानले जाते. जनप्रतिनिधींनी मतदारांपासून तथ्य लपविल्यास संबंधित निवडणूक रद्द होण्यासह लोकप्रतिनिधित्व कायदा, 1951 मधील तरतुदींनुसार अपात्रतेची कारवाई होऊ शकते, असे ॲड. रोहिदास मुंडे यांनी स्पष्ट केले.*

*■ विशेषतः लोकप्रतिनिधित्व अधिनियम 1951 मधील कलम 33A, कलम 36 तसेच भारतीय न्यायव्यवस्थेने वेळोवेळी दिलेल्या आदेशांनुसार उमेदवाराने सत्य व संपूर्ण माहिती देणे बंधनकारक आहे. खोटी माहिती सादर करणे किंवा तथ्य लपविणे हे मतदारांची दिशाभूल करणारे कृत्य मानले जाते.*

*■ “सदर बाब न्यायालयाच्या विचाराधीन असून संबंधित उमेदवारांविरोधात निवडणूक याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेमध्ये शपथपत्रातील माहितीबाबत आक्षेप घेण्यात आले आहेत.”*

“ या प्रकरणात रमाकांत मढवी, शैलेश पाटील, आदेश भगत, दीपक जाधव, साक्षी मढवी, दर्शना म्हात्रे, अर्चना पाटील, दिपाली भगत आणि स्नेहा पाटील या नगरसेवकांविरोधात न्यायालयात निवडणूक याचिका दाखल करण्यात आली असल्याची माहिती ॲड. रोहिदास मुंडे यांनी दिली.

# आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी घेतला बुलेट ट्रेनच्या कामाचा प्रत्यक्ष अनुभव

पालघर : आदिवासी विकास प्रकल्प डहाणू अंतर्गत येणाऱ्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी देशातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला भेट देऊन एक अविस्मरणीय अनुभव घेतला. डहाणूचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी विशाल खत्री आणि एल अँड टी कंपनी यांच्या संकल्पनेतून या विशेष अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष प्रचिती विद्यार्थ्यांना मिळावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. सध्या डहाणू प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सवने, झरी, तलासरी, तवा, साखरे, रणकोळ, अस्वाली, वरवाडा, डोंगरी आणि उधवा अशा एकूण १० आश्रमशाळांमधील ३५० विद्यार्थी बारावीच्या पूर्वतयारीसाठी ‘क्रॅश कोर्स’ अंतर्गत जादा तास करत आहेत. या अभ्यासक्रमाचा भाग म्हणून आणि विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच विरंगुळा मिळावा या दृष्टीने ४५ विद्यार्थ्यांची त्यांच्या इच्छेनुसार निवड करण्यात आली होती. या निवडक विद्यार्थ्यांनी बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या कार्यस्थळाला भेट देऊन तेथील तांत्रिक बाबी समजून घेतल्या.

## महिनाभरात १० लाख प्रवाशांनी केला नव्या मेट्रोने प्रवास

भाईंदर : दहिसर-मिरा भाईंदर शहरासाठी सुरू करण्यात आलेल्या मेट्रो सेवेत पहिल्याच महिन्यात दहा लाख प्रवाशांनी प्रवास केल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे ही मेट्रो सेवा यशस्वी ठरल्याचा दावा केला जात आहे. मिरा भाईंदर शहरातून मुंबईच्या दिशेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी आहे. मात्र रेल्वेमधील वाढती गर्दी आणि वाहतूक कोंडीची समस्या लक्षात घेता, मुंबई मेट्रोला मिरा भाईंदरशी जोडून प्रवाशांसाठी नव्या प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. यासाठी दहिसर-मिरा भाईंदर मेट्रो मार्गिका ९ उभारण्यात आली आहे. यातील दहिसर ते काशिगाव हा पहिला टप्पा ७ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन करून सेवेत दाखल करण्यात आला. ही सेवा सुरू झाल्यापासूनच प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मागील महिनाभरात जवळपास दहा लाखांहून अधिक प्रवाशांनी या मेट्रो सेवेतून प्रवास केल्याची माहिती एमएमआरडीएकडून देण्यात आली आहे.



■ महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते

## शहीद तुकाराम ओंबळे बॅडमिंटन हॉल येथील लॉन टेनीस कोर्टचे उद्घाटन

ठाणे (गणेश भोईटे) : ठाणे महानगरपालिकेच्या वतीने शहीद तुकाराम ओंबळे बॅडमिंटन हॉल येथील नुतनीकरण करण्यात आलेल्या लॉन टेनिस कोर्टचे उद्घाटन आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते करण्यात आले. या ठिकाणी अनेक अधिकारी लोकप्रतिनिधी हे टेनिस खेळण्यासाठी येत असतात, त्यांच्या मागणीनुसार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निधीतून या लॉनचे नुतनीकरण करण्यात आले असून याचा लाभ जास्तीत अधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी घ्यावा असे आवाहन महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी यावेळी केले.

या उद्घाटनास उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्ष नेते अशरफ ऊ. शानू पठाण, अतिरिक्त आयुक्त 1 संदीप माळवी, उपायुक्त क्रीडा मीनल पालांडे, स्थानिक नगरसेवक वैभव कदम, माजी नगरसेवक शरद कणसे, कार्यकारी अभियंता शैलेंद्र चारी, संदीप गायकवाड, ऋषिकेश माने आदी उपस्थित होते.

विविध आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या अधिका-यांना विरंगुळा मिळावा यासाठी महापालिकेने हे लॉन टेनीस कोर्ट तयार केले होते. या ठिकाणी अनेक अधिकारी, माजी अधिकारी तसेच लोकप्रतिनिधींनी सदस्यत्व घेतले असून ते नियमित खेळासाठी येत असतात. हा लॉन टेनिस कोर्ट अद्ययावत करण्याची मागणी येथे येणाऱ्या अधिकाऱ्यांनी केली होती. त्यानुसार अद्ययावत पध्दतीने हा टेनिस कोर्ट तयार करण्यात आला असून त्याचे उद्घाटन आज झाले असल्याचे महापौरांनी जाहीर केले.

शहीद तुकाराम ओंबळे बॅडमिंटन कोर्ट येथे नियमितपणे विविध वयोगटांसाठी प्रशिक्षण बॅचेसही चालविण्यात येणार आहेत. क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी तसेच येथे सदस्यत्व घेतलेल्या खेळाडूंना दर्जेदार क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या लॉन टेनिसचे नुतनीकरण करण्यात आले आहे. ठाणे शहरात लॉन टेनिसची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल उपमहापौर कृष्णा पाटील यांनी महापालिकेला धन्यवाद दिले.

> “ ठाणे शहराचा विकास वेगाने होत असून त्यादृष्टीने शहरातील क्रीडा सुविधांमध्ये वाढ झाली पाहिजे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या निधीतून अद्ययावत असा टेनीस कोर्ट तयार झाला असून याचा निश्चितच फायदा शहरातील तरूणांना होणार असल्याचे सभागृह नेते हणमंत जगदाळे यांनी नमूद केले.

# अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सवर कारवाईचे आदेश; कंपनी मालकांवर FIR दाखल करण्याची मागणी

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे सायबर क्राईम विभागाला पत्र

मुंबई : राज्यात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या अनधिकृत बाईक टॅक्सी सेवांविरोधात परिवहन विभागाने कठोर भूमिका घेतली असून, ओला, उबर आणि रॅपिडोसारख्या अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप सेवा तात्काळ बंद करून संबंधित कंपनी मालकांवर FIR दाखल करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी महाराष्ट्र सायबर विभागाच्या अतिरिक्त पोलीस महासंचालकांना अधिकृत पत्र पाठवले आहे. तसेच परिवहन आयुक्तांनी देखील अशा आशयाचे पत्र सायबर क्राईम विभागाला दिले आहे.

मंत्री सरनाईक यांनी पत्रात नमूद केले आहे की, राज्यात गेल्या काही महिन्यांपासून



> “राज्य शासन नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत कटिबद्ध असून, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही अनधिकृत व्यवस्थेला पाठीशी घातले जाणार नाही,” असा स्पष्ट इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

विविध ॲप्सच्या माध्यमातून कोणतीही वैध परवानगी, शासन मान्यता किंवा परिवहन विभागाच्या नियमांचे पालन न करता प्रवासी वाहतूक सुरू आहे. विशेषतः रॅपिडोसारख्या संस्थांच्या अनधिकृत बाईक टॅक्सींचे प्रमाण वाढत असून, ही बाब सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

या अनधिकृत सेवांमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेची कोणतीही हमी नसून चालकांची पडताळणी, विमा संरक्षण, महिला सुरक्षाविषयक उपाययोजना तसेच आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणा अत्यंत अपुरी असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

मंत्री सरनाईक यांनी नुकत्याच घडलेल्या एका अपघाताचाही उल्लेख केला आहे. मुंबईतील मुलुंड -गोरेगाव लिंक मार्गावर अनधिकृत बाईक टॅक्सीचा अपघात होऊन एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे त्यांनी नमूद केले असून, या प्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात FIR दाखल झाल्याची माहितीही पत्रात देण्यात आली आहे. तसेच विविध पोलीस ठाण्यांमध्ये अशा प्रकारच्या घटनांची नोंद होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे. याशिवाय, शासनाच्या परिवहन नियमांचे खुलेआम उल्लंघन करून या ॲप्समार्फत आर्थिक व्यवहार सुरू असल्याने परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांच्या व्यवसायावर अन्यायकारक परिणाम होत असल्याचे परिवहन विभागाने म्हटले आहे. कायद्याला न जुमानता सुरू असलेली ही व्यवस्था राज्याच्या परिवहन व्यवस्थेसाठी गंभीर आव्हान बनत असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

सायबर क्राईम विभागाकडे करण्यात आलेल्या मागण्यांमध्ये अनधिकृत बाईक टॅक्सी ॲप्सचे ऑनलाईन संचालन तात्काळ बंद करणे, संबंधित ॲप कंपन्या, चालक आणि व्यवस्थापनाविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायदा व मोटार वाहन कायद्यानुसार कठोर कारवाई करणे तसेच कंपनी मालकांवर गुन्हे दाखल करण्याचा समावेश आहे.

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्याचा ठाणे काँग्रेसकडून निषेध

# राहुल गांधी रिस्पेक्टेड नेते : विक्रांत चव्हाण

ठाणे (मेधा भोईटे) : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभेतील विरोधी पक्ष नेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याबाबत आक्षेपहार्य विधान केले आहे. राहुल गांधी हे रिस्पेक्टेड नेते' असून ठाणे काँग्रेसने आज देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या वक्तव्याचा पत्रकार परिषद घेत निषेध केला.

पत्रकार परिषदेला ठाणे काँग्रेस अध्यक्ष विक्रांत चव्हाण, मुख्य प्रवक्ते राहुल पिंगळे, महिला अध्यक्ष स्मिता वैती, प्रदेश सदस्य भालचंद्र महाडिक, निशिकांत कोळी, शिरीष घरत, सुभाष ठोंबरे, उमेश कांबळे, नुर्शिद शेख, अरुण राजगुरू, प्रकाश मयेकर, हरिश्चंद्र खरात, अच्युत

### देवेंद्र फडणवीस सगळ्या बाबतीत बॅकफूट वर



नलावडे, बाळा डकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

राहुल गांधी रिजेक्टेड नेते नसून देशातील रिस्पेक्टेड नेते आहेत. ज्यांना महाराष्ट्र राज्यातील समस्या सोडवण्यात येत नाही ते राहुल गांधींबद्दल वक्तव्य करत आहेत. जेव्हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते तेव्हा महाराष्ट्र राज्य पाचव्या नंबरवर होता. मात्र त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्र राज्य भ्रष्टाचार, गुन्हेगारी, भोंदूगिरी आणि स्त्रियांवर अत्याचारामध्ये प्रथम क्रमांकावर असल्याची टीका विक्रांत चव्हाण यांनी केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची खुर्ची डळमळीत झाली आहे. लवकरच कोणीही तरी नवा चेहरा आपल्या समोर येईल. देवेंद्र फडणवीस सगळ्या बाबतीत बॅकफूट वर आले आहेत. कुठल्याही प्रकारचा विकास होत नाही. शेतकऱ्यांसाठी कोणतीही उपाययोजना होत नाहीत, लॉ अँड ऑर्डर विस्कळीत झाले आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली आजही अनेक राज्यांत काँग्रेस किंवा आघाडीचे सरकार आहे. राहुल गांधी यांच्यावर टीका करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तितकी उंची नसल्याची टीका विक्रांत चव्हाण यांनी केली आहे.



# जनगणना २०२७ अनुषंगाने मिरा भाईंदर पालिकेत आढावा बैठक संपन्न

भाईंदर : जनगणना २०२७ च्या अनुषंगाने मंगळवार, दिनांक १२ मे २०२६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये मा. प्रधान जनगणना अधिकारी तथा आयुक्त राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीदरम्यान जनगणना २०२७ च्या अंमलबजावणीसंदर्भातील विविध बाबींचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यामध्ये क्षेत्रनिहाय नियोजन, प्रगणकांची नियुक्ती, प्रशिक्षण प्रक्रिया, माहिती संकलन पद्धती, नागरिकांशी समन्वय तसेच सर्वेक्षण कार्य प्रभावी व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. जनगणना प्रक्रिया ही देशाच्या विकासनियोजनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याने सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.

तसेच, निर्गमित केलेल्या आदेशान्वये जे पर्यवेक्षक व प्रगणक अद्याप जनगणना २०२७ प्रक्रियाकरीता रुजू झाले नाही अशा पर्यवेक्षक व प्रगणकांवर गुन्हा दाखल करण्याचे निर्देश मा. अतिरिक्त आयुक्त यांनी चार्ज ऑफिसर यांना आजच्या बैठकीत दिले. जनगणना २०२७ अंतर्गत दिनांक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रत्यक्ष सर्वेक्षण प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या कालावधीत नियुक्त प्रगणक व अधिकारी घरोघरी भेट देऊन नागरिकांची माहिती संकलित करणार आहेत. सर्व नागरिकांनी प्रगणकांना योग्य व अचूक माहिती देऊन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

तसेच, जनगणना प्रक्रियेदरम्यान नागरिकांनी अधिकृत ओळखपत्र असलेल्या प्रगणकांनाच माहिती द्यावी आणि जनगणना कार्य यशस्वीरीत्या पूर्ण होण्यासाठी सकारात्मक सहभाग नोंदवावा, असेही महानगरपालिकेतर्फे स्पष्ट करण्यात आले आहे. जनगणना २०२७ मधून प्राप्त होणारी माहिती ही भविष्यातील शहरी नियोजन, पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण, वाहतूक तसेच विविध शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याने नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

■ आज मुख्यमंत्री फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्र पवार, रविंद्र चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवर उलवे नोडमध्ये

# लोकनेते रामशेठ ठाकूर अमृतमहोत्सवी अभिष्टचिंतन सोहळा आणि रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या इमारतीचे उद्घाटन

पनवेल : सर्व समाजाचे प्रेरणास्थान, गोरगरिबांचे आधारस्तंभ, थोर दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सत्कार सोहळा तसेच दर्जेदार शिक्षण देणाऱ्या आणि नावलौकिक असलेल्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलच्या इमारतीचा उदघाटन सोहळा महाराष्ट्राचे राज्याचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दिनांक १३ मे रोजी सायंकाळी ०६.३० वाजता उलवे नोड मधील सेक्टर १२ येथील रामशेठ ठाकूर मैदानावर भव्य स्वरूपात होणार आहे.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे वने मंत्री गणेश नाईक, महिला व बाल कल्याण मंत्री आदितीताई तटकरे, रोजगार हमी फलोत्पादन व खार जमीन विकास मंत्री भरतशेठ गोगावले, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष व रायगड लोकसभा खासदार सुनिल तटकरे, मावळ लोकसभा खासदार श्रीरंग बारणे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य



आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार रवीशेठ पाटील, आमदार डॉ. विश्वजित कदम, आमदार मंदाताई म्हात्रे, आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार निरंजन डावखरे, आमदार विक्रांत पाटील, आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, माजी खासदार धैर्यशिल पाटील, रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्यातून हजारो युवकांना रोजगार, शिक्षण व सामाजिक आधार देण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक शैक्षणिक आणि सामाजिक संस्था उभ्या राहिल्या असून समाजातील सर्व घटकांसाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर हे समाजकारणाला प्राधान्य देणारे आणि दानशूर वृत्तीचे नेतृत्व म्हणून ओळखले जातात. गरीब कुटुंबातून पुढे येत त्यांनी संघर्षाच्या जोरावर आपले स्थान निर्माण केले. त्यांच्या कार्याचा मुख्य गाभा समाजसेवा आहे. शिक्षण, सामाजिक, आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक, आपत्ती मदत या क्षेत्रांमध्ये त्यांनी मोठे योगदान दिले आहे. अनेक शिक्षण संस्थांना मदत करून ग्रामीण आणि कष्टकरी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे त्यांनी खुली केली. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून ते सतत गरजू लोकांना मदत करतात. समाजातील वंचित, पीडित आणि गरजू लोकांना आधार देणे हे त्यांचे जीवनव्रत आहे.राजकारणात असूनही त्यांनी नेहमी समाजकारणाला अग्रक्रम दिला. साधेपणा, जनसंपर्क आणि लोकाभिमुख कार्यामुळे ते महाराष्ट्रातील एक आदर्श लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यामुळे त्यांचा अमृतमहोत्सवी वर्ष महत्वाचा आणि प्रेरणादायी आहे. त्याच अनुषंगाने लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनावर आधारीत आढावा घेणाऱ्या ‘रामपर्व’ या विशेष पुस्तकाची निर्मिती करण्यात आली असून त्याचे प्रकाशनही यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. उलवे परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक आणि दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे या उद्देशाने उभारण्यात आलेली रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल ही प्रशस्त इमारत, सुसज्ज वर्गखोल्या अत्याधुनिक सुविधा आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण पद्धतीमुळे परिसरासाठी अभिमानाची बाब ठरली असून या विद्यालयाच्या इमारतीचा उद्घाटन सोहळा यावेळी संपन्न होणार आहे. तरी या विशेष सोहळ्यास पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक हितचिंतकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संचालक आमदार प्रशांत ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समितीचे अध्यक्ष आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते व समितीचे कार्याध्यक्ष जे.एम.म्हात्रे आणि लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

‘महाराष्ट्र सम्राट’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१